**महत्त्वाचे**

## तनुजा भालेराव हिचे वक्तृत्व स्पर्धेत यश



**लोहगाव (वार्ताहर)–** रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत आयोजित उत्तर विभागीय वकृत्व स्पर्धेत तनुजा भालेराव हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.अहिल्यानगर येथे रयतच्या उत्तर विभागीय कार्यालयाच्यावतीने कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत आयोजित इयत्ता आठवी ते दहावी या गटामध्ये प्रवरानगर येथील महात्मा गांधी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी तनुजा भालेराव हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेसाठी नगर, बीड व नाशिक या जिल्ह्यातून शंभर पेक्षा अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धा संपताच विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, बाबासाहेब नाईकवाडी, गुणवत्ता कक्ष प्रमुख काकासाहेब वाळुंजकर, योगेश उगले आणि परीक्षकांच्या हस्ते तनुजा भालेराव व मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती आंबेकर यांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. या स्पर्धेसाठी सचिन झगडे, संजय बर्डे व बी. एन. माळशिखरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. तिच्या यशाबद्दल रावसाहेब म्हस्के, उपाध्यक्ष अरुण कडू, एकनाथ घोगरे, प्र. प्राचार्य संजय ठाकरे, प्र. मुख्याध्यापक सुभाष भुसाळ, प्र. पर्यवेक्षक अनिल जाधव, उपप्राचार्य अलका आहेर, विभाग प्रमुख डॉ. शरद दुधाट, बाबासाहेब अंत्रे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

# अन् ते २४ वर्षांनी आले पुन्हा एकत्र

## शाळेला वॉटर प्युरिफायर संच भेट



**रांजणगाव देशमुख (वार्ताहर)–** गेल्या २४ वर्षापासून अनेकांनी एकमेकाला पाहिलेही नाही. काही व्यवसायात स्थिरावले, काही नोकरी करतात. काही शेती करतात तर काही राजकीय क्षेत्रात काम करतात असे सर्वजण २४ वर्षांनी पुन्हा एकत्र आले. निमीत्त होते जय हनुमान विद्यालयातील माजी विद्यार्थी व माजी शिक्षक यांच्या स्नेहमेळाव्याचे. यावेळी या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला २५० लिटर प्रति तास क्षमतेचा वॉटर प्युरिफायर संच भेट दिला. आता शाळेतील सर्व मुलांना शुद्ध पाणी उपलब्ध होईल.

कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख येथील जय हनुमान विद्यालयातील सन २००० मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व त्यांना शिकवणारे त्या काळचे शिक्षक यांचा स्नेहमेळावा विद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आंबेकर होते. तब्बल २४ वर्षानंतर आपल्या विद्यार्थ्यांना पाहून सेवानिवृत्त झालेले शिक्षकही भारावून गेले. आपल्या माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले, जीवन खुप सुंदर आहे. त्याचा आनंद मिळवणे आपल्या हातात आहे. जीवनाचा आनंद घेत जा. आई-वडिलांची सेवा करा. व्यसनापासून दूर रहा. जीवन जगण्याला अध्यात्माची व कर्तृत्वाची जोड द्या. अशा मौलिक शब्दात त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना सल्ला दिला.

याप्रसंगी आलेल्या माजी शिक्षकांचा गौरव करण्यात आला. येणाऱ्या काळात सुख-दुःखात आपण बरोबर राहू, असा निर्णय यावेळी घेण्यात आला. २४ वर्षानंतर पुन्हा एकत्र येण्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. कविता, जिवनात सध्या येत असलेले विविध अनुभव सांगत स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. उपस्थित शिक्षकांच्या हस्ते शाळेकडे वॉटर प्युरिफायर संच शाळेला देण्यात आला.

# बोटा येथील सप्ताहात आमदार खताळ बनले वाढपी

## भाविकांना पंगतीत वाढली आमटी-भाकरी



**संगमनेर (तालुका प्रतिनिधी) –** तालुक्याच्या पठार भागातील बोटा येथे सुरू असणाऱ्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज वैकुंठ गमन महोत्सवानिमित्ताने आयोजित सप्ताहात आमदार अमोल खताळ नुसते सहभागी झाले नाही तर त्यांनी पंगतीमध्ये आमटी-भाकरी महाप्रसाद घेत पंगतीतील भाविकांना आमटी-भाकरी वाढण्याचे काम केले. धार्मिक कार्यात कुणीही लहान-मोठा नाही हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे वैकुंठ गमनास ३७५ वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने संगमनेर-अकोले तालुक्याच्या सरहद्दीवरील बोटा येथे १०० गावांच्या सहभागातून हा महोत्सव सुरू आहे. यामुळे बोटानगरीला देहूनगरीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यास नुकतीच आमदार अमोल खताळ यांनी भेट दिली. बोटा ग्रामस्थांच्यावतीने सप्ताह आयोजक, सरपंच पांडुरंग शेळके, माजी पंचायत समिती सदस्य संतोष शेळके यांनी आमदार खताळ यांचा सत्कार केला. यावेळी मनसे रस्ते व्यवस्थापन समितीचे जिल्हाध्यक्ष किशोर डोके, भाजप भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश फटांगरे, शिवसैनिक गुलाब भोसले, पूजा सोनवणे, अमित शेळके, खंडू जाधव, अमित कुलकर्णी, पप्पू कुरकुटे, गणू काका, सचिन बोडके, रवी शेळके, विजय पानसरे, रमेश काळे, दत्तात्रय महाराज भोर, किशोर महाराज धुमाळ, अमोल महाराज बोडके, अक्षय महाराज बोडके आदी उपस्थित होते. माझ्या आईवडिलांचे आणि वारकरी संप्रदायाच्या आशीर्वादाने मी आमदार झालो. माझ्या विजयात वारकरी संप्रदायाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे धर्माचं काम गुप्ततेत झाले पाहिजे. यामुळे या धार्मिक कार्यासाठी हवी ती मदत करेल, असा विश्वास आमदार खताळ यांनी यानिमित्ताने दिला.

# शिकवणीसाठी येणाऱ्या शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य

**पुणे (प्रतिनिधी)–** शिकवणीसाठी येणाऱ्या शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य करणाऱ्या २५ वर्षीय शिकवणी चालक तरुणाविरुद्ध भारती विद्यापीठ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, शिकवणी चालक तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण खासगी शिकवणी घेतो. पीडित मुलगी त्याच्याकडे शिकवणीसाठी जायची. आरोपी तिला अश्लील चित्रफीत दाखवायचा. तू जर अभ्यास करताना चुकली तर तुला शिक्षा देईल, असे सांगून तिच्याशी अश्लील कृत्य करायचा. घाबरलेल्या मुलीने या प्रकाराची माहिती आईला दिली. त्यानंतर आईने पोलिसांकडे तक्रार दिली.

या शिकवणी चालक तरुणाविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक दोडमिसे तपास करत आहेत. कोंढवा भागातील एका शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य केल्याप्रकरणी विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचालकाला पोलिसांनी नुकतीच अटक केली होती. कर्वेनगर भागातील एका नामांकित शाळेतील विद्यार्थ्यांशी नृत्यशिक्षकाने अश्लील कृत्य केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला असताना पुन्हा हा घृणास्पद प्रकार समोर आल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

# रचनात्मक काम करणाऱ्या व्यक्तीचे नाव शैक्षणिक संकुल परिसरास दिल्याचा अभिमान

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन; दंत महाविद्यालयाचे प्रशांत शैक्षणिक संकुल नामकरण

**सोनई (वार्ताहर)–** सामाजिक कार्यात जीव ओतून काम करणारे व्यक्तीमत्व म्हणजे प्रशांत गडाख, दंत महाविद्यालयासाठी झोकून देऊन माळरानावर शैक्षणिक संकुल उभे करून रचनात्मक काम करणाऱ्या व्यक्तीमत्वाचे नाव शैक्षणिक संकुलाच्या परिसरास दिल्याचा मनस्वी अभिमान असल्याचे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत गडाख यांच्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय, वडगाव गुप्ता येथे शैक्षणिक संकुलाचे प्रशांत संकुल प्रवेशद्वाराचे लोकापर्ण तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी व अवांतर वाचनासाठी आवश्यक




ओपन (मुक्त) वाचनालय इमारत भुममिपूजन, वृक्षारोपण कार्यक्रम पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते व माजी मंत्री शंकरराव गडाख, मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख, यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष नेहल गडाख, कार्यकारी संचालक यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज डॉ. सुभाष देवढे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. उपस्थितांचे स्वागत डॉ. सुभाष देवढे यांनी केले.

याप्रसंगी उदयन गडाख म्हणाले, प्रशांत गडाख यांनी ज्या सामाजिक उपक्रमांची सुरुवात केली, ते सामाजिक उपक्रम राबवून आपण आज त्यांचा वाढदिवस साजरा करत आहोत. यापुढेही यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पद्मश्री पोपटराव पवार व माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते नेवासा तालुक्यातील हिंगोणी, सोनई, मोरयाचिंचोरे, शिरेगाव, म्हाळसपिंपळगाव येथील सार्वजनिक वाचनालयास पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी नगर शहरासह नेवासा तालुक्यातील विविध गावांमधील संस्थेचे पदाधिकारी, प्रशांत गडाख मित्रमंडळाचे सदस्य, महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार नेहल गडाख यांनी मानले.

# भारताच्या तुलनेत अमेरिकेवर १० पट कर्ज अधिक

**नवी दिल्ली–** जगावरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत आहे. जगातील देशावरील कर्ज हे १०२ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले आहे. हे कर्ज खूप मोठ्या प्रमाणात आहे. वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्सने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी च्या हवाल्याने कर्जदार देशांची यादी शेअर केली आहे. यामध्ये अमेरिकेवर सर्वाधिक कर्ज आहे, तर चीन आणि जपान दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. भारताबद्दल बोलायचे झाले तर जगातील एकूण कर्जाच्या ३.२ टक्के कर्जाचा वाटा भारतावर आहे.

अमेरिका हा सर्वात मोठा कर्जदार देश आहे, जर आपण वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्सने जाहीर केलेल्या आकडेवारी पाबिली तर सध्या जगावर एकूण १०२ ट्रिलियन डॉलर्सचे कर्ज आहे. त्यात सर्वात जास्त कर्ज हे अमेरिकेवर आहे. अमेरिकेवर ३६ ट्रिलियन डॉलर्सचे कर्ज आहे. जे जागतिक कर्जाच्या ३४.६ टक्के आहे.ड्रॅगनची अवस्थाही बिकट आहे. चीन हा जगातील दुसरा सर्वात मोठा कर्जदार देश आहे. जर आपण चीनच्या कर्जाबद्दल बोललो तर चीनवर १४.६९ ट्रिलियन डॉलर्सचे प्रचंड कर्ज आहे. जे संपूर्ण जगाच्या कर्जाच्या १६.१ टक्के आहे.

**अमेरिकेनंतर चीन आणि जपानचा नंबर**

कर्जाच्या बाबतीत अमेरिका आणि चीननंतर जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे. आयएमएफच्या मते, जगातील एकूण कर्जांपैकी १० टक्के कर्ज जपानवर आहे. अहवालानुसार, ते सुमारे १०.८० ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढले आहे. कर्जाच्या बाबतीत ब्रिटन (णघ) चौथ्या क्रमांकावर आहे. जे जागतिक कर्जाच्या ३.६ टक्के आहे. याशिवाय फ्रान्स पाचव्या क्रमांकावर आहे. या देशावर कर्जाचा वाटा हा ३.५ टक्के आहेत तर इटली कर्जाच्या बाबातीत सहाव्या क्रमाकांवर आहे. कर्जाचा वाटा हा ३.२ टक्के आहे.

# पत्रकारांनी जागविल्या माजी मंत्री पिचडांच्या आठवणी

## निळवंडे धरणाला नाव देण्याची केली मागणी

**अकोले (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पत्रकारांनी माजी मंत्री मधुकर पिचड यांच्या आठवणी जागवत असा नेता पुन्हा होणे नाही अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

माजी आदिवासी विकास मंत्री मधुकर पिचड यांचे अलिकडेच दुःखद निधन झाले. अकोले तालुक्याच्या विकासात मोठे योगदान देणारे आणि आदिवासींचे अनेक प्रश्न मार्गी लावणारे स्व. मधुकर पिचड यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी नुकतेच अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यात पाणी अडविण्याच्या माध्यमातून त्यांनी न भूतो न भविष्य असे काम केले असल्याने जलनायक असा त्यांचा उल्लेख केला. मागील तीस वर्षांत अहिल्यानगर जिल्ह्यात अकोलेचा अपवाद वगळता एकही धरण झाले नाही. तालुक्यात मात्र स्वर्गीय पिचडांमुळे एक डझनभर धरणे बांधली गेली. हे त्यांची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासकीय कौशल्यामुळे शक्य झाले.

निळवंडे धरणाच्या निर्मितीतील त्यांचे योगदान लक्षात घेऊन धरणाला स्वर्गीय लोकनेते मधुकरराव पिचड यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. रस्ते, वीज, पाणी याबाबत त्यांनी केलेल्या शाश्वत स्वरूपाच्या कामाचा फायदा तालुक्यातील भावी अनेक पिढ्यांना होत राहणार आहे. तालुक्यातील विरोधक संपविण्याचे प्रयत्न त्यांनी कधीही केले नाही. पत्रकारांनी अनेकवेळा त्यांच्या विरुद्ध लिखाण केले, मंत्री असताना त्यांनी पत्रकारांबद्दल काढलेल्या काही उद्गारांबद्दल पत्रकार संघाने त्यांचा जाहीर निषेध केला होता. पण तरीही पत्रकारांना त्रास देण्याचे काम त्यांनी कधीही केले नाही. लोकशाहीचा नेहमीच सन्मान केला अशा भावना ज्येष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर, भाऊसाहेब मंडलिक, अमोल वैद्य, शांताराम काळे, हेरंब कुलकर्णी, भाऊसाहेब चासकर, सागर शिंदे, डॉ. विश्वास आरोटे, हेमंत आवारी, प्रकाश आरोटे, रमेश खरबस, सुनील गिते, हरिभाऊ फापाळे, भाऊसाहेब वाकचौरे, संदीप दातखिळे आदी पत्रकारांनी मनोगते व्यक्त करत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला.

कॉम्रेड कारभारी उगले यांनी ६० वर्षांहून अधिक काळ राजकीय, सामाजिक जीवनात स्वर्गीय मधुकर पिचड यांचा संपर्क आला. राजकीयदृष्ट्या आमचे कधी पटले नाही पण त्यांनी कधीही संबंधात कटूता येऊ दिली नाही, अशा उंचीचा माणूस होणे नाही असे सांगतानाच स्व. पिचड यांची अभिवादन सभा आयोजित करून पत्रकारांनी जी संवेदनशीलता दाखवली त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रास्ताविकात श्रीनिवास रेणुकदास यांनी स्व. पिचड यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. प्राचार्य विद्याचंद्र सातपुते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. चंद्रशेखर हासे यांनी आभार मानले. यावेळी गणेश आवारी, नंदकुमार मंडलिक, अशोक उगले, आबासाहेब मंडलिक, अमोल शिर्के, भाऊसाहेब साळवे, प्रकाश महाले, राजू जाधव, राजेंद्र मालुंजकर, विलास तुपे, नरेंद्र देशमुख, भारत रेघाटे, अल्ताफ शेख, प्रशांत देशमुख, प्रवीण धुमाळ, संजय शिंदे, राजेंद्र उकिर्डे, सचिन लगड, साहित्यिक प्रा. डॉ. सुनील शिंदे, भाऊसाहेब कासार, आरपीआयचे तालुकाध्यक्ष राजेंद्र गवांदे आदींसह पत्रकार उपस्थित होते.

# ‘आधार’ची गौरी संघर्षावर मात करत झाली अभियंता

## चेन्नईतील कंपनीत वार्षिक सव्वाचार लाखांच्या पगारावर झाली निवड

**महेश पगारे**

**संगमनेर –** येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या आधार फाऊंडेशनच्या शैक्षणिक दत्तक पालक योजनेतून अभियंता (इंजिनिअर) झालेल्या गौरी राऊत हिची नुकतीच मुलाखतीमध्ये चेन्नई येथील नामांकित कंपनीत वार्षिक सव्वाचार लाख रुपयांच्या पगारावर निवड झाली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून तिने हे यश मिळवले आहे. यामुळे तिला आभाळ ठेंगणे झाले आहे. या निवडीचा तिच्यासह कुटुंबीय आणि आधारनेही आनंद व्यक्त केला आहे.

संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथील गौरी वंदना संतोष राऊत हिच्या वडिलांची एक किडनी निकामी झाल्याचे निदान झाले. यामुळे कुटुंबाच्या पायाखालची वाळूच सरकली. आठवड्यातून तीनवेळा डायलिसिस, भावाचे आणि तिचे शिक्षण व कुटुंबाची



जबाबदारी हाताळताना आईचे खूप हाल झाले. वेळप्रसंगी उपासमारीची वेळ आली. या गंभीर टप्प्यात ‘आधार’ फाऊंडेशनच्या रूपाने देवच भेटला. ही तारेवरची कसरत सुरु असताना दुर्दैवाने २०१९ साली वडिलांचा आधार गेला. इतके मोठे दुःख पचवून आईने कुटुंब सावरताना मुलांना जगण्याचं बळ आणि प्रेरणा दिली. त्या राष्ट्रीय स्थायी विकास संस्था संगमनेर येथे काम करत आहे. आई नेहमी म्हणते, की ‘माझ्या दोन्ही मुलांनी या संघर्षातून उभं राहून मोठं करिअर करावे, स्वतःवर व कर्तृत्वावर विश्वास ठेवावा’. या विश्वासाला तडा जाऊ न देता प्रचंड मेहनत घेत, जिद्द, उर्मी आणि चिकाटीच्या जोरावर गौरी नेहमीच कॉलेजमध्ये टॉपर राहिली आहे. संगमनेर येथे बारावीपर्यंत शिक्षण घेताना नववीपासूनच आधारने स्टेशनरी, शूज, सॅक, शालेय ड्रेस, परीक्षा फी आणि सर्व आवश्यक गोष्टी दिल्या. त्यामुळेच महाविद्यालयातील २०२५ च्या तुकडीत बोटावर मोजण्याइतक्या विद्यार्थ्यांमध्ये नामांकित कंपनीमध्ये तिने स्थान मिळवले आहे. सध्या ती पुणे येथील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयात मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत आहे. यासाठी आधारबरोबर तिला लीला पूनावाला फाउंडेशन यांनीही मदत करत उच्च शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी ४५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली आहे. या यशाबद्दल सगळेच आनंदून गेले असून आधार फाउंडेशनच्या कार्यालयात सामाजिक कार्यकर्ते उमेश भालसिंग यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला.

> ▸ माझा भाऊ प्रसाद नाशिक येथे शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पूर्ण करत आहे. मी लवकरच देशातील सर्वोत्तम इंजिनियर बनण्याचं, देशाला स्वतःच्या कर्तृत्वाने महान बनवण्यासाठी खारीचा वाटा उचलण्याचा स्वप्न पाहत आहे. स्वतःच्या पायावर उभी राहून माझ्या कुटुंबाबरोबरच आधारच्या विद्यार्थ्यांनाही मदत करणार आहे. आधारच्या मुलांनी मिळालेल्या संधीचे सोने करत चांगलं शिक्षण घ्यावं, स्वतःच्या परिवाराबरोबर संस्थेला आपल्यासारख्याच मुलांना उभे राहण्यासाठी बळं द्यावं. माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल, अविरत प्रयत्नांसाठी आणि तुमच्या आशीर्वादांसाठी आधार परिवाराचे आभार मानते.
>
> **–गौरी राऊत**

# औषधांचा नशेसाठी वापर ; तरुणीला अटक

**पुणे (प्रतिनिधी)–** वेदनाशामक, तसेच भुलीसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचा नशेसाठी वापर करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. बेकायदा औषधांची विक्री करणाऱ्या एका तरुणीला हडपसर पोलिसांनी अटक केली. तिच्याकडून एक लाख रुपयांच्या मेफेटरमाईन सल्फेट औषधाच्या (टर्मिन) १६० बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत.

अंबिका उर्फ नेहा आनंदसिंह ठाकूर (वय २६ रा. माळवाडी, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्या तरुणीचे नाव आहे. तिच्याविरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी हडपसर पोलिसांचे पथक गस्त घालत होते. त्यावेळी हडपसर भागात राहणारी अंबिका ठाकूर ही वेदनाशामक तसेच भूल देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक अर्जुन कुदळे, उपनिरीक्षक महेश कवळे यांच्या पथकाने तिला ताब्यात घेतले.

# रोजगार हमी योजनेच्या मजुरांना पाच महिन्यापासून मजुरी मिळेना

## जिल्ह्यातील २७ हजार मजुरांचे ३७ कोटी रुपये थकले

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात सध्या महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे (मग्रारोहयो) ३ हजार ३०५ कामे सुरू असून त्यावर २७ हजार ५८३ मजूर काम करत आहेत. मात्र त्यांना गेल्या पाच महिन्यांपासून त्यांच्या मजुरीचे पैसे मिळालेले नाही. तसेच कुशल कामाचीही गेल्या जानेवारीपासूनची रक्कम अदा केली गेलेली नाही. जिल्ह्यातील ही कुशल व कुशल कामाची थकीत रक्कम ३७ कोटींवर गेली आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने सुमारे २१ कोटी रूपयांची मागणी सरकारकडे केली आहे, मात्र ते अद्याप मिळालेले नाहीत.

‘रोहयो’मार्फत मागेल त्याला काम देण्याचा कायदा करण्यात आला. काम उपलब्ध होत असले तरी पाच-पाच महिन्यांचे वेतन मिळत असल्याने मजूर हवालदिल झाले आहेत. महाराष्ट्रभर हीच परिस्थिती असल्याचे सांगण्यात आले. केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध न झाल्याने राज्य सरकारनेही हात आखडता घेतला आहे. परिणामी मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात मजुरांच्या वेतनाचे १२ कोटी १७ लाख रुपये तर कुशल (यंत्रसामग्रीने केलेले काम) कामाचे सुमारे २५ कोटी रुपये थकले आहेत. सार्वजनिक बांधकामसारख्या काही विभागांकडील कुशल कामाची रक्कम तर जानेवारीपासून थकलेली आहे. जिल्ह्यात सध्या ग्रामपंचायतीकडील कामांवर २३ हजार ६६८ तर विविध यंत्रणांकडील कामांवर ३ हजार ९१५ मजूर उपस्थित आहेत. ऐन उन्हाळ्याच्या परिस्थितीतही यापूर्वी ‘मग्रारोहयो’ वरील मजुरांची उपस्थिती २७ हजारांवर पोहोचलेली नव्हती. गेल्या उन्हाळ्यात मे २०२४ मध्ये २० हजारावर उपस्थिती होती. आता मात्र ती उच्चांकी ठरली आहे. राज्य सरकारच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासनाने सन २०२१-२२ पूर्वीची ३ हजार १४४ अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मोहीम १२ डिसेंबरपासून सुरू केली आहे. त्यानंतर उपस्थिती वाढली आहे. अन्यथा त्यापूर्वी उपस्थिती १३ ते १४ हजार दरम्यान होती. या कालावधीत १ हजार २५० कामे पूर्ण करण्यात आली.

> ▸ **मजुरांची तालुकानिहाय थकलेली रक्कम पुढीलप्रमाणे–**
> जामखेड २ कोटी ८४ लाख, कर्जत ३ कोटी २६ लाख, पारनेर १ कोटी ७२ लाख, संगमनेर १ कोटी ३२ लाख, पाथर्डी ३३ लाख १५ हजार, शेवगाव २९ लाख ८७ हजार, अकोले ४१ लाख ६१ हजार, कोपरगाव २६ लाख, श्रीगोंदे २८ लाख ३० हजार, श्रीरामपूर २८ लाख ६७ हजार, राहाता १६ लाख २ हजार, नेवासा ३८ लाख ७१ हजार, नगर २३ लाख ८१ हजार व राहुरी ३५ लाख ८० हजार रूपये.